जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३२२ दिनांक - ०३/०५/२०२३**

## सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर
## स्पा सेंटरवर छापा टाकुन ०६ पिडीत महिलांची सुटका

दि.०२/०५/२०२३ रोजी अमायरा स्पा,शॉप नं.डी-६० सॉलीटर बिझनेस हब,विमाननगर,पुणे येथे मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालत असले बाबत गोपनीय माहिती प्राप्त झालेने सदर ठिकाणी सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे,शाखेकडील अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी बनावट गि-हाईक पाठवुन खात्री केली असता,नमुद मसाज सेंटर मध्ये स्पा-मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालु असल्याचे आढळुन आल्याने,तात्काळ छापा कारवाई करून सदर ठिकाणावरून **एकुण ०६ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे.**

सदर ठिकाणाहुन **मोबाईल व रोख रक्कमेसह एकुण १,२८,५००/-** (एक लाख अठ्ठावीस हजार पाचशे) रू किचा मद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यावेळी स्पा मॅनेजर यांना ताब्यात घेवुन व पाहिजे आरोपी स्पा चालक असे एकुण ०४ इसमांविरूध्द **विमानतळ पोलीस स्टेशन येथे गुरनं.२१२/२०२३,भादवि ३७०,३४,सह अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक अधिनियम कायदा कलम ३,४,५** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपी व पिडीत महिलांना पुढील कारवाई करीता विमानतळ पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री. संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,भरत जाधव तसेच सहा.पोलीस निरीक्षक,अश्विनी पाटील, पोलीस अंमलदार बाबा कर्पे, अजय राणे, इम्रान नदाफ, इरफान पठाण, रेश्मा कंक, ओंकार कुंभार या पथकाने यशस्वी केली आहे.